# 'स्वरशब्द काळजाचा' कविसंमेलन रंगले

शिराढोण, दि. २ (सा.वा.) -

*'किती धावलो बाळांसाठी चुकलो आपण*
*कुठे सांग ना स्वत:साठी जगलो आपण*
*रोज नव्याने जिंकत गेली बाळे आपली*
*आयुष्याच्या संध्याकाळी हरलो आपण.'*


अशा दर्जेदार गझल आणि कवितांनी शरदचंद्र महाविद्यालय, शिराढोण आणि स्पंदन साहित्य कला, क्रीडा चॅरिटेबल फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्ताने व मराठी विभागाच्या वतीने आयोजित मराठीतील नव्या पिढीतील कवीचे 'स्वरशब्द काळजाचा' या काव्य मैफिलीचे कविसंमेलन उत्तरोत्तर रंगत गेले.

वास्तवाचा विसर पडू न देता कवींनी आभासी जगाचा फेरफटका मारलेला श्रोत्यांना अधिकच भावला. या संमेलनात महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून ख्यातनाम कवी, कवयित्रींना निमंत्रित करण्यात आले होते. डॉ. मदन देगावकर, जीवन धेंडे, गझलकार शेखर गिरी, नवनाथ खरात, डॉ. सय्यद अकबर लाला, कवयित्री कोमल पाखरे व शरदचंद्र महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी गझलकार माकोडे सारिका भड आदी मंचावर उपस्थित होते.

'स्वरशब्द काळजाचा' या काव्य मैफिलीची सुरुवात राजमाता जिजाऊ आणि स्त्री शिक्षणाच्या पुरस्कर्त्या सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. बार्शी येथील डॉ. मदन देगावकर यांनी रानावनाच्या मातीच्या कवितेतून ग्रामीण साज-शृंगार चढवलेली ग्रामीण कवितेने जीवनदर्शन घडविले. कवी जीवन भेंडे यांनी 'चारचौघात मी मोजके ठेवले, दु:ख माझे जरा बोलके ठेवले' या कवितेने रसिक मनाचा ठाव घेतला. सुप्रसिद्ध गझलकार शेखर गिरी यांनी आपल्या गझलेतून समाजव्यवस्थेवर ताशेरे ओढले. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गझलकार इलाही जमादार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण वाहण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. डी. बिराजदार होते. प्रमुख पाहुणे म्हणून एपीआय वैभव नेटके, उपप्राचार्य साजिद चाऊस, मराठी विषयाचे विभागप्रमुख डॉ. आत्तार अमजत, सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. सय्यद अमर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. ए. एच. आतार यांनी केले तर कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन डॉ. फारुख तांबोळी यांनी करून उपस्थितांची मने जिंकली.

आभार डॉ. सूर्यकांत दळवी यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यार्थी आणि शिराढोण परिसरातील रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तब्बल अडीच तास रंगलेल्या काव्य मैफिलीच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.



*शिराढोण : येथील शरदचंद्र महाविद्यालयात आयोजित 'स्वरशब्द काळजाचा' या काव्यमैफिलीत गझल सादर करताना कलाकार.*

Scanned with OKEN Scanner



कळंब तालुक्यातील शिराढोण येथील शरदचंद्र महाविद्यालयात काव्य मैफील पार पडली. यात सहभागी झालेले कवी.

# शिराढोणमध्ये रंगली काव्य, गझल मैफील

लोकमत न्यूज नेटवर्क

**उस्मानाबाद :**

'किती धावलो बाळांसाठी
चुकलो आपण'
'कुठे सांग ना स्वतःसाठी
जगलो आपण'
'रोज नव्याने जिंकत गेली
बाळे आपली'
'आयुष्याच्या संध्याकाळी
हरलो आपण.'

अशा दर्जेदार गझल आणि कवितांनी शिराढोणच्या शरदचंद्र महाविद्यालयात आयोजित 'स्वरशब्द काळजाचा' ही काव्यमैफील उत्तरोत्तर रंगत गेली. महाविद्यालय आणि स्पंदन साहित्य कला, क्रीडा चॅरिटेबल फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्ताने व मराठी विभागाच्या वतीने या मैफीचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. जे. डी. बिराजदार तर प्रमुख पाहुणे म्हणून सपोनि. वैभव नेटके, उपप्राचार्य साजिद चाऊस, मराठी विषयाचे विभाग प्रमुख डॉ. आत्तार अमजत, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. सय्यद अमर यांची उपस्थिती होती.

वास्तवाचा विसर पडू न देता कवींनी आभासी जगाचा मारलेला फेरफटका श्रोत्यांना अधिकच भावला. या संमेलनात महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून ख्यातनाम कवींना निमंत्रित करण्यात आले होते. डॉ. मदन देगावकर, जीवन धेंडे, गझलकार शेखर गिरी, नवनाथ खरात, डॉ. सय्यद अकबर लाला, कवयित्री कोमल पाखरे व शरदचंद्र महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी गझलकार माकोडे सारिका भड यांचा समावेश होता. 'स्वर शब्द काळजाचा' या काव्य मैफिलीची सुरुवात राजमाता जिजाऊ आणि स्त्री शिक्षणाच्या पुरस्कर्त्या सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. बार्शी येथील डॉ. मदन देगावकर यांनी रानावनाच्या मातीच्या कवितेतून ग्रामीण साज-शृंगार चढवलेल्या ग्रामीण कविताने जीवन दर्शन घडवले. कवी जीवन भेंडे यांनी 'चारचौघात मी मोजके ठेवले, दुःख माझे जरा बोलके ठेवले' या कवितेने रसिक मनाचा ठाव घेतला.

सुप्रसिद्ध गझलकार शेखर गिरी यांनी आपल्या गझलेतून समाज व्यवस्थेवर ताशेरे ओढले. प्रारंभी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गझलकार इलाही जमादार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. प्रस्ताविक प्रा. डॉ. ए. एच. आतार यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. फारुख तांबोळी यांनी तर डॉ. सूर्यकांत दळवी यांनी आभार मानले.

Scanned with OKEN Scanner

तेरणा एक्सप्रेस

शुक्रवार, ५ ते ११ मार्च २०२१

३

Sharadchandra Mahavidyalaya
College Code 184
Shiradhon Tq.Kallam

# शरदचंद्र महाविद्यालयात इंटरनॅशनल ई-परिषदेचे आयोजन

तेरणा एक्सप्रेस न्यूज नेटवर्क / शिराढोण : शिराढोण येथील शरदचंद्र महाविद्यालयात भूगोल विभाग व आय. क्यू. ए.सी. च्या वतीने फिजिकल अंड ह्यूमन डायमेन्शन ऑफ इन्वायरमेंट क्लायमेट चेंज अँड सस्टेनेबल डेव्हलपमेंट या विषयाच्या अंतर्गत दि.२५ फेब्रु. रोजी एक दिवसीय अंतर विद्याशाखीय इंटरनॅशन ई– परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेचे उद्घाटक डॉ . अफसर शेख होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. ई.यू मासूमदार आझांद हे उपस्थित होते .

या परिषदेचे प्रमुख साधन व्यक्ती म्हणून डॉ. प्रवीण सप्तर्षी, विजिटिंग प्रोफेसर सॅलिस्बरी युनिव्हर्सिटी यु. एस. ए., डॉ. एम. एफ. नदाफ गोवा, तसेच डॉ.प्रतीक रॉय दार्जीलिंग, वेस्ट बंगाल. हे घन कचरा व्यवस्थापन, जल व्यवस्थापन, हवामान बदल, शाश्वत विकास जागतिक तापमान वाढ, नैसर्गिक आपत्ती, पर्यावरण संवर्धन याविषयी ऑनलाइन मार्गदर्शन केले यावेळी वेगवेग ळ्या विद्यापीठातील भूगोलतज्ञांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. दादासाहेब गजहंस, चेअरमन भूगोल अभ्यास मंडळ औरंगाबाद, डॉ.मंजुनाथ मानकरी चेअरमन, भूगोल अभ्यास मंडळ नांदेड, डॉ. एन.के. वाघमारे, नांदेड यांनी ही यावेळी संवाद घडवून आणला. या परिषदेत जवळपास अडीचशे भारतातील व भारताबाहेरील प्राध्यापकांचा सहभाग होता. यावेळी काही निवडक पेपर चे वाचनही करण्यात आले. यात डॉ.व्ही. गोविंदनकुट्टी केरळ, डॉ. सदफ मॅडम, बिहार,डॉ. शिव शंकरी मॅडम चेन्नई, तामिळनाडू, डॉ. महेश लावटे मुंबई, यांनी या परिषदेत उत्कृष्ट असे पेपर वाचन केले. भारतातील वेगवेगळ्या राज्यातून जवळपास २०० पेपर आलेले होते. त्या पेपर चे प्रकाशन इंटरनॅशनल जर्नल मध्ये केलेले आहे. या परिषदेचे प्रस्ताविक डॉ.शेख ए. आय.भूगोल विभाग प्रमुख यांनी केले तर स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. डी. बिराजदार यांनी केले, उपप्राचार्य डॉ. साजिद चाऊस यांनी देखील एका सेशनचे अध्यक्षीय समारोप केले. या परिषदेचे सूत्रसंचालन प्रा .गंभीरे पि.यू. यांनी केले तर आभार डॉ.शेरमाळे यांनी केले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी वर्गानी या इंटरनॅशनल परिषदे च्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

प्रा.डॉ. सय्यद अमर
प्रसिद्धि विभाग प्रमुख

PRINCIPAL
Sharadchandra College
Shiradhon Ta.kallam

Scanned with OKEN Scanner